# नि.दि.दावा क्र. ३७/२०१८ मधील नि.५ खालील आदेश

**CNR NO.MHTH17000450-2018**

दत्तात्रेय पाटील ... वादी

विरुद्ध

नलिनी पाटील व इतर ... प्रतिवादी

..........

वादीने दाखल केलेला तात्पुरता मनाईहुकूमाचा अर्ज आणि त्याला प्रतिवादी क्र. १ ते १६ यांनी दिलेले उत्तर यांचे अवलोकन करण्यात आले. वादीतर्फे करण्यात आलेला युक्तिवाद आणि प्रतिवादी क्र. १ ते १६ यांनी दाखल केलेला लेखी युक्तिवाद विचारात घेण्यात आला. हा अर्ज निकाली काढताना माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. खालील चर्चित कारणास्तव त्या मुद्दयांचे उत्तर त्यासमोर देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| (१) | सकृतदर्शनी वादीच्या बाजूमध्ये तथ्य असल्याचे दिसून येते काय ? | होय. |
| (२) | संतुलनाची तुला ही वादीच्या बाजुने आहे काय ? | होय. |
| (३) | तात्पुरता मनाईहुकूम न मिळाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे काय ? | होय. |
| (४) | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## —: कारणमिमांसा :—

**मुद्दे क्र. १ ते ३ करीता :—**

२. वादींचे म्हणणे थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे:—

वादीचे असे म्हणणे आहे की, दाव्यातील शेतजमिनी हया वादी आणि प्रतिवादी क्र. १ ते १८ यांच्या संयुक्त कुटूंबाची मालमत्ता आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, या संयुक्त मालमत्तेची सरस—निरस वाटणी

आजपर्यंत झालेली नाही. तसेच वादीचे असेही म्हणणे आहे की, कौटुंबिक व्यवस्था म्हणून प्रत्येक सभासदाच्या ताब्यामध्ये काही शेतजमिन देण्यात आली आहे आणि त्याप्रमाणे ७/१२ उता—यावर नोंद झालेली आहे. परंतु, वादीचे असे म्हणणे आहे की, सरस—निरस वाटणी अजूनही झालेली नाही. त्यामुळे ती वाटणी करुन मिळावी म्हणून वादीने दावा दाखल केला आहे. वादीला भिती आहे की, प्रतिवादी क्र. १ ते १८ हे ७/१२ उता—यावरील नोंदीचा गैरफायदा घेऊन दाव्यातील शेतजमिन विकून टाकली आणि म्हणून वादीने विनंती केली आहे की, त्यांना तात्पुरते तरी रोखण्यात यावे.

३. प्रतिवादी क्र. १ ते १६ यांनी त्यांच्या उत्तरामध्ये पुढीलप्रमपाणे बचाव घेतला. त्यांचे असे म्हणणे की, १९७८ साली सयुंक्त असलेले पाटील कुटूंबिय हे विभक्त झालेले आहेत. तसेच दि. १७/१०/१९८८ रोजी लेखी वाटणी झालेली आहे आणि त्या वाटणीनुसारच प्रत्येकाच्या ताब्यामध्ये जमिनीचा हिस्सा आहे आणि वाटणीप्रमाणेच ७/१२ उता—यावर तशी नोंद झालेली आहे. या प्रतिवादींचे असे म्हणणे की, जमिन विकण्यापासून त्यांना रोखण्यात आले तर त्यांना त्यांच्या संपत्तीचा उपभोग घेता येणार नाही आणि त्यामुळे वादीचा अर्ज खारीज करण्यात यावा.

४. दाव्यामध्ये ज्या शेतजमिनीचा उल्लेख आहे त्या एकूण १६ जमिनी आहेत. त्या कधी काळी एकत्र कुटूंबियांची संपत्ती होत्या, त्यामुळे त्यांची सरस—निरस वाटणी झाली आहे अथवा नाही हा महत्वपूर्ण मुद्दा उपस्थित झाला आहे. सरस—निरस वाटणी झाली हे सिध्द करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र. १ ते १६ यांची आहे. त्यामुळे त्या मुद्दयाचा निकाल जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत दाव्यातील शेतजमिनीचे हस्तांतरण रोखणे जास्त सोयीस्कर आहे. अन्यथा या दाव्यामधील गुंता आणखी वाढेल.

५. प्रतिवादी क्र. १ ते १८ यांना जमिनी हस्तांतरणे करण्यापासून जर रोखण्यात आले तरीसुध्दा ज्या प्रतिवादीच्या ताब्यामध्ये जी जमिन आहे तिचा उपभोग तो प्रतिवादी घेऊ शकतो. म्हणून जमिन हस्तांतरण करण्यापासून जर रोखले तर प्रतिवादी क्र. १ ते १८ यांचे विशेष असे काही नुकसान होणार नाही. म्हणून मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे व पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१) नि.क्र. ५ वरील अर्ज हा खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. १ ते १८ यांनी त्यांचे नातेवाईक, त्यांचे हस्तक, त्यांचेमार्फत इतर कुणीही या दाव्याचा निकाल लागेपर्यंत दाव्यातील शेतजमिनींचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये. तसेच दाव्यातील शेतजमिनीवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

३) खर्चाबाबत आदेश मुळ दाव्यात करण्यात येतील.

स्वाक्षरी/—
(केतनकुमार तेलगांवकर)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पालघर. (न्यायालय क्र.१)

पालघर.
दिनांक : २०/०६/२०१९